# प्रेसनोट

नाशिक,
दि. १६/०४/२०२४

**आलोसे क्र १. धिरज मनोहर पाटील, अभिलेखाकार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचे कार्यालय, नाशिक आलोसे क्र २. सोमा गोविंद भोये, शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचे कार्यालय, नाशिक यांनी ५००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक शहर |
| कलम | गु.र.नं. ११०/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ व १२ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १.धिरज मनोहर पाटील, अभिलेखाकार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचे कार्यालय, नाशिक<br>२. सोमा गोविंद भोये, शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचे कार्यालय, नाशिक |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ५००/-रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांची केस लवकर निकाली काढणे व लवकर सुनावणीसाठी बोर्डावर घेणे तसेच त्यांचे फाईलचे पेपर कामासाठी झेरॉक्स काढण्यासाठी देण्याचे मोबदल्यात आलोसे क्र १.धिरज मनोहर पाटील, अभिलेखाकार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचे कार्यालय, नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे ५००/- रू लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र १.धिरज मनोहर पाटील, अभिलेखाकार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचे कार्यालय, नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे ५००/- रुपये लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.१५.०४.२०२४ रोजी स्विकारली व त्यांचे लाचमागणीस आलोसे क्र २. सोमा गोविंद भोये, शिरस्तेदार, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग यांचे कार्यालय, नाशिक यांनी प्रोत्साहन दिल्याने त्यांना पकडण्यात आले असुन दोघांविरूद्ध सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक शहर गु.र.नं. ११०/२०२४ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ व १२ प्रमाणे दि. १६.०४.२०२४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.

| | | |
|---|---|---|
| संपर्क पत्ता | :- | ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक |
| संकेतस्थळ | :- | acbmaharashtra.gov.in |
| ई-मेल | :- | spacbnashik@mahapolice.gov.in |
| ऑनलाईन तक्रार | :- | acbmaharashtra.net |
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२५३-२५७५६२८, २५७८२३० |
| व्हॉट्स ॲपक्र | :- | ९९३०९९७७०० |

( नरेंद्र भा.पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक